सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ९४ | गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५ | पाने : ४

अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com


## दिनविशेष
२५ डिसेंबर

- आय.एन.एस. विजयदुर्ग भारतीय नौदलात सामील झाले.
- वर्ल्ड वाइड वेबची पहिली यशस्वी चाचणी.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# भारतीयांचे अमेरिकेत जाण्याचे स्वप्न भंगले?

## डोनाल्ड ट्रम्प यांचा एच १ बी व्हिसासंदर्भात आणखी एक मोठा निर्णय; भारताला कसा बसणार फटका?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प एच १ बी व्हिसा नियमांत मोठे बदल करत आहेत. ज्याचा थेट फटका भारतीयांना बसत आहे. एच १ बी व्हिसा प्रक्रियेत मोठे बदल करत नव्या नियमांची घोषणा केल्याने अमेरिकेतील भारतीय चिंतेत आहेत, तर व्हिसाचे नूतनीकरण करण्यासाठी आलेले शेकडो परदेशस्थ भारतीय भारतातच अडकले आहेत. आता डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. ज्यामुळे हजारो भारतीयांसाठी अमेरिकेची दारे बंद होतील, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय व्यावसायिकांसाठी अमेरिकेत काम करण्यासाठी 'एच १ बी व्हिसा लॉटरी' हा एक मुख्य मार्ग होता. मात्र, आता हा प्रवेशमार्ग पूर्णपणे बदलला जात आहे. डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने एच १ बी व्हिसा वाटपाची जुनी 'रँडम लॉटरी' पद्धत रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याऐवजी अधिक वेतन आणि विशेष कौशल्ये असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देणारी निवड प्रक्रिया लागू केली आहे. या निर्णयाचा सर्वाधिक फटका भारतीय अर्जदारांना बसण्याची शक्यता आहे. नवा नियम काय आहे? भारतीयांवर या निर्णयाचा काय परिणाम होणार?

**नवा नियम काय?**


'यूएस सिटीझनशिप ॲण्ड इमिग्रेशन सर्व्हिसेस'चे प्रवक्ते मॅथ्यू ट्रॅगेसर यांनी 'असोसिएटेड प्रेस'शी बोलताना सांगितले, की एच १ बी नोंदणीच्या सध्याच्या लॉटरी पद्धतीचा अमेरिकन नियोक्त्यांकडून गैरवापर केला जात होता. अमेरिकन कामगारांना द्यावे लागणाऱ्या पगारापेक्षा कमी पगारात परदेशी कामगारांना कामावर ठेवण्यासाठी या पद्धतीचा आधार घेतला जात होता.' विभागाच्या म्हणण्यानुसार नवीन सुधारित प्रणालीमध्ये 'वेटेड सिलेक्शन प्रोसेस' लागू केली जाईल. यामुळे उच्च-कुशल आणि जास्त पगार घेणाऱ्या परदेशी नागरिकांना एच १ बी व्हिसा मिळण्याची शक्यता वाढेल.

**नक्की काय बदलणार?**

जुनी लॉटरी पद्धत आता 'वेटेज' आधारित निवड प्रणालीने बदलली जाईल. एका माध्यमातील वृत्तानुसार आता व्हिसाचे वाटप वेतनश्रेणी आणि कौशल्याच्या आधारावर केले जाईल. ज्यांचे पगार जास्त आहेत आणि ज्यांच्याकडे विशेष कौशल्ये आहेत अशा अर्जदारांना प्राधान्य दिले जाईल. कमी पगारावर कामगार भरती करून यंत्रणेचे होणारे शोषण थांबविणे आणि अमेरिकन कामगारांचे वेतन व नोकरच्या संधींचे संरक्षण करणे, हा या बदलाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. हा नवीन नियम २७ फेब्रुवारी २०२६ पासून लागू होईल आणि आगामी एच १ बी कॅप नोंदणीसाठी ग्राह्य धरला जाईल. एकत्रितपणे विचार केल्यास हे सर्व बदल भारतीय अर्जदारांसाठी विशेषतः सुरूवातीच्या स्तरावरील नोकऱ्या शोधणाऱ्यांसाठी धक्कादायक आहेत. एका माध्यमाच्या मते ऐतिहासिकदृष्ट्या अनेक भारतीय तंत्रज्ञानांनी अमेरिकेत करिअर घडविण्यासाठी एच १ बीचा वापर केला आहे. पण आता लॉटरी पद्धत बंद झाल्यामुळे निवडीचे पारडे केवळ उच्च पगार असलेल्यांच्या बाजूने झुकणार आहे. या बदलत्या परिस्थितीमुळे अनेक कंपन्यांना आपल्या धोरणांत बदल करावा लागू शकतो. ते नोकऱ्या पुन्हा भारतात हलवू शकतात किंवा अमेरिका सोडून इतर देशांमध्ये आपली सेंटर्स वाढवू शकतात. तसेच अमेरिकेतील संधी कमी झाल्यामुळे भारतीय व्यावसायिक आणि विद्यार्थी आता कॅनडा किंवा युरोपसारख्या पर्यायांकडे वळू शकतात किंवा भारताच्या वेगाने वाढणाऱ्या तंत्रज्ञान क्षेत्रातच आपले करिअर घडवू शकतात.

### या निर्णयामागील भूमिका काय?

'डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटी' आणि 'यूएस सिटीझनशिप ॲण्ड इमिग्रेशन सर्व्हिसेस'च्या मते काही कंपन्या कमी पगारावर परदेशी कामगार आणण्यासाठी लॉटरी पद्धतीचा गैरवापर करत होत्या. ज्यामुळे अमेरिकन कामगारांच्या रोजगारावर आणि पगारावर गदा येत होती. एका माध्यमातील वृत्तानुसार उच्च वेतन आणि उच्च कौशल्याला प्राधान्य देणे हा अमेरिकन काँग्रेसचा (अमेरिकी संसद) मूळ उद्देश आहे. यामुळे देशाची स्पर्धात्मकता वाढेल, असे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.



### भारतीयांनाच याचा सर्वाधिक फटका का?

सध्या दरवर्षी जारी केल्या जाणाऱ्या एकूण एच १ बी व्हिसांपैकी ७० टक्क्यांहून अधिक व्हिसा भारतीय नागरिकांना मिळतात, जे प्रामुख्याने तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि सेवा क्षेत्रात कार्यरत असतात. त्यामुळे व्हिसा वाटप पद्धतीत होणारा कोणताही बदल थेट भारतीय अर्जदारांवर परिणाम करतो. कारण ते या योजनेचे सर्वांत मोठे लाभार्थी आहेत.

ज्यांच्याकडे अफाट अनुभव आणि उच्च वेतन आहे अशा कुशल कामगारांना नवीन प्रणालीतही संधी मिळू शकते. मात्र मध्यम स्तरातील व्यावसायिक, ज्युनिअर इंजिनिअर्स आणि छोट्या कंपन्या किंवा कन्सल्टन्सीमार्फत अर्ज करणाऱ्यांच्या संधी मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतात. 'बिझनेस स्टँडर्ड'नुसार अशा लोकांची वेतनश्रेणी अनेकदा प्राधान्य गटात बसणाऱ्या उच्च श्रेणीपेक्षा कमी असते.

**याशिवाय ट्रम्प प्रशासनाच्या इतर काही निर्णयांचाही मोठा परिणाम होणार आहे.**

**१) १० हजार डॉलर्स वार्षिक व्हिसा शुल्क :** नवीन एच १ बी व्हिसा अर्जांवर १ लाख डॉलर्सचे वार्षिक शुल्क लादले जाणार आहे. तज्ज्ञांच्या मते याचा फटका मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या तुलनेत छोट्या कंपन्यांना जास्त बसेल. अशा कंपन्यांमध्ये अनेक भारतीय कर्मचारी नोकरी करतात.

**२) सोशल मीडिया आणि कडक तपासणी :** सोशल मीडियाची माहिती आणि कडक तपासणीमुळे भारतात एच १ बी आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या एच ४ व्हिसा मुलाखतींना आधीच विलंब होत आहे.

## ट्रकची दुचाकीला धडक; दोघांचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील गलवाडे रस्त्यावरील हॉटेल केसरीसमोर भरधाव ट्रकने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाला. ही घटना बुधवार, दि. २४ डिसेंबर रोजी दुपारी एकच्या सुमारास घडली. या अपघातात दुचाकीचालक ईश्वर आनंदा पाटील यांचा जागीच मृत्यू झाला, तर दुचाकीवर मागे बसलेले समाधान भिकन पाटील हे गंभीर जखमी झाले होते. मात्र, उपचारादरम्यान समाधान पाटील यांचाही मृत्यू झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. या घटनेचा मारवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यासंदर्भात विश्वास भगवान पाटील (वय 48, रा. गलवाडे, ता. अमळनेर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ईश्वर आनंदा पाटील व समाधान पाटील

हीरो स्प्लेंडर या दुचाकीवरून (एमएच १९- ईडी ९५५९) हे गलवाडे रस्त्याने अमळनेरकडे येत असताना अमळनेरकडून गलवाडेकडे जाणाऱ्या भरधाव ट्रकने (आरजे १४-जीजे ९१३७) रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करीत दुचाकीला जोरदार धडक दिली. या घटनेबाबत ट्रकचालक रुस्तम जैनू (रा. भुतलाका, सहसौला ८३, मेवात-हरियाणा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा सहाय्यक पोलीस निरीक्षक जिभाऊ तुकाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई मुकेश साळुंखे तपास करीत आहेत.

# मंगळग्रह सेवा संस्थेच्या पुढाकारातून सेवेकऱ्यांसाठी अपघाती विमा योजना

## भारतीय टपाल विभागाच्या अधिकाऱ्यांकडून योजनांबाबत मार्गदर्शन



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था ही सामाजिक जाणिवेचे उचित भान राखत सेवेकऱ्यांचे हित जोपासणारी संस्था म्हणून कार्यरत आहे. या संस्थेच्या पुढाकारातून भारतीय टपाल विभागातर्फे अधिकाऱ्यांनी टाटा एआयजी आणि बजाज अलायन्स या कंपन्यांच्या मदतीने विविध अपघाती विमा योजनांची माहिती तसेच योजनांतील सहभागासाठी अर्ज कसा करावा, यासंदर्भात सेवेकऱ्यांना सविस्तरपणे मार्गदर्शन केले.

या अपघाती विमा योजनेचा लाभ १८ ते ६५ वयोगटांतील व्यक्तींना घेता येणार आहे. या योजनेंतर्गत संबंधित व्यक्तीला अपंगत्व आल्यास, पॅरालिसीस झाल्यास अथवा अपघाती मृत्यू झाल्यास कंपन्यांच्या मदतीने टपाल विभाग आर्थिक लाभ मिळवून दिला जाणार आहे. या योजनांमध्ये सहभाग नोंदवायचा असल्यास अर्ज कसा भरावा तसेच त्यासाठी लागणारी विविध कागदपत्रे यांचीही माहिती यावेळी भारतीय टपाल विभागाचे संदीप रावण पाटील, विनोद चौधरी,

पान ३ वर

### योजना व मिळणारा लाभ

हा ग्रुप गार्ड वैयक्तिक अपघात विमा आहे. ५२० तसेच ५९९ रुपये वार्षिक हप्त्याच्या या विमा योजना आहेत. यामध्ये विमाधारकाचा अपघाती मृत्यू झाल्यास, कायमस्वरूपी पूर्ण अपंगत्व आल्यास, आंशिक अपगत्व आल्यास १० लाख रुपये वारसाला आर्थिक लाभ मिळेल. तसेच अपघात होऊन विमाधारकाला रुग्णालयात दाखल केले असल्यास रुग्णालयाचा दैनिक भत्ता म्हणून १० दिवसांसाठी ५००/- रुपयांप्रमाणे, अंत्यसंस्कार खर्च ५०००/- रुपये, मृत्यूच्या अवशेषांची वाहतूक-५०००/- रुपये, कोमा केअर-५०००/- अपघाती स्थिती रुग्णालयात दाखल-५० हजार रुपये, रोड रुग्णवाहिका-प्रत्येक दाव्यासाठी १,०००/- रुपये, एअर ॲम्ब्युलन्स- १ लाख रुपये, जीवनशैलीत बदल-१० हजार रुपये, मुलांचे शिक्षण लाभ- ५० हजार रुपये, टेलि सल्ला-अमर्यादित, तसेच प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीसाठी आर्थिक लाभ दिला जातो.



# मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र कागदावरच

## भूमिपूजनाला सोळा महिने उलटूनही काम रखडले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील टाकरखेडा रस्त्यावरील शासकीय भूखंड क्रमांक ३७६ वर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र सुरू करण्यास जिल्हा प्रशासनाने मंजूरी दिली होती. केंद्रासाठी टेकडीवर असलेली दोन एकर जागा देण्यात आली. या ठिकाणी ५ ऑगस्ट २०२४ मध्ये भूमिपूजन झाले. त्या वेळी अभ्यास केंद्राचे काम आठ महिन्यात पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, १६ महिने उलटले तरी अभ्यास केंद्राचे काम अद्यापही रखडले आहे. नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र उभारण्यास प्रशासनाने मंजूरी दिली होती.

पान ३ वर

"अभ्यास केंद्राला पहिल्या टप्प्यात दोन एकर जागा मिळाली होती. मात्र, मुरूम असलेल्या उंच टेकडीवर अभ्यास केंद्राच्या वास्तूचा प्लॅन बसला नाही. त्यामुळे पुन्हा अतिरिक्त दोन एकर जागा मिळविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाशी पत्रव्यवहार केला. सर्व शासकीय प्रक्रिया पूर्ण होऊन आता अभ्यास केंद्राला चार एकर जागा मिळाली आहे. त्यामुळे लवकरच काम सुरू होईल.

**-शिवकुमार वंजारी,** कार्यकारी अभियंता.












# एन्काऊंटरचे गूढ उलगडणार जितेंद्र जोशी

## ‘ मॅजिक ’ चित्रपटाचा ट्रेलर लाँच

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जितेंद्र जोशींच्या ‘ मॅजिक ’ चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. एका एन्काऊंटरमागील रहस्य आणि सत्याचा शोध ही या चित्रपटाची मुख्य कथा असल्याचे दिसून येत आहे. दमदार अभिनय आणि थरारक मांडणीमुळे हा चित्रपट प्रेक्षकांसाठी खास ठरण्याची शक्यता आहे.

अभिनेते जितेंद्र जोशी यांची मुख्य भूमिका असलेल्या ‘ मॅजिक ’ चित्रपटाचा ट्रॅलर लाँच झाला आहे. ही कथा रहस्यमय आहे. एन्काऊंटरचे गूढ, अत्तराच्या सुवासाचे ‘ मॅजिक ’ काय आहे, असा प्रश्न प्रेक्षकांना हा चित्रपट गुंतवून ठेवतो. नुकताच अभिनेते सलमान खान यांच्या हस्ते या चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला. सायकोलॉजिकल पद्धतीने गोष्ट उलगडणारा ‘ मॅजिक ’ हा चित्रपट नव्या वर्षात १ जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. ‘ मॅजिक ’ चित्रपटाची कथा एक एन्काऊंटरभोवती फिरताना दिसते. ट्रेलरमध्ये दाखविण्यात आलेल्या दृख्यांमधून एन्काऊंटरमागील सत्य, पोलीस तपास आणि त्यात दडलेले गूढ यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

तुतारी व्हेंचर्स या निर्मिती संस्थेच्या राजू सत्यम यांनी ‘ मॅजिक ’ या चित्रपटाची निर्मिती केली आहे. ‘ आई कुठे काय करते ’सारख्या उत्तमोत्तम मालिकांचे दिग्दर्शन केलेल्या रवींद्र विजया करमरकर यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. कथालेखन योगेश विनायक जोशी, रवींद्र विजया करमरकर यांचे आहे. अभिषेक देशमुख यांचे पटकथा लेखन, केदार फडके यांचे छायांकन, देवेंद्र भोमे, चिनार-महेश यांनी संगीत, दिनेश पुजारी, नयनेश डिंगणकर यांचे संकल आहे.

### ‘ हे ’ आहेत चित्रपटातील कलाकार


चित्रपटात जितेंद्र जोशी एन्काऊंटर स्पेशालिस्टच्या मुख्य भूमिकेत आहे. सिद्धीरुपा करमरकर, जुई भागवत, प्रियांका पालकर, रुपा मांगले, नितीन भजन, मयूर खांडगे, अभिजित झुंजारराव, गुरुराज कुलकर्णी, योगेश केळकर, रसिकराज प्रदीप डोईफोडे यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.

### चित्रपटाच्या कथेविषयी...

एन्काऊंटर स्पेशालिस्ट असलेल्या पोलीस अधिकाऱ्याने केलेला एन्काऊंटर आयुष्यात घडणाऱ्या उलथापालथींची गोष्ट ‘ मॅजिक ’ या चित्रपटात आहे. एन्काऊंटर केल्यानंतर हा पोलीस अधिकारी गावी येतो. पण एक मुलगी तेथे पोहोचते आणि मग सुरू होतो एक वेगळा खेळ... हे नेमके प्रकरण काय आहे, एन्काऊंटर आणि अत्तर यांचा काय संबंध असतो, ती मुलगी नेमकी कोण असते अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मोठ्या पडद्यावरच मिळणार आहेत.

जितेंद्र जोशी यांनी याआधीही अनेक गंभीर आणि वास्तववादी भूमिका साकारून प्रेक्षकांची प्रशंसा मिळविली आहे. त्यामुळे ‘ मॅजिक ’मधील त्यांचा परफॉर्मन्सही विशेष ठरणार, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.






# आपण किती रक्ताचे दान करू शकतो ?


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असे म्हटले जाते. मात्र त्याबाबतीत अनेक समज-गैरसमज आहेत. जेव्हा आपल्या कोणातरी अतिशय जवळच्या आप्तावर शस्त्रक्रिया होणार असेल तेव्हा डॉक्टर काही बाटल्या रक्ताची सोय करायला आपल्याला सांगतात. त्यावेळी आपण आपल्या मित्रांना, ओळखीच्या व्यक्तींना, काही वेळा अनोळखी व्यक्तींनाही रक्तदानासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करतो. मग त्यांनी विचारलेल्या प्रश्नांमधून हे समज, बहुतांशी गैरसमज उघड होतात.

जखमेमुळे रक्तस्राव होणे शरीरस्वास्थ्याला धोकादायक आहे, ही समजूत तशी बरोबर आहे. त्यात चूक नाही. मात्र किती रक्त शरीरातून वाहून गेले तरी शरीर ते सहन करू शकते, याची माहिती अनेकांना नसते. शरीरातून वाहून गेलेल्या रक्तामुळे झालेले नुकसान कायमस्वरूपी नसते. शरीर त्याची भरपाई करतच असते. मात्र या भरपाईचा वेग मर्यादित असल्यामुळे एकावेळी आपण किती रक्ताचा ऱ्हास सहन करू शकतो, यावर मर्यादा पडतात. साधारणपणे एकूण रक्ताच्या १० ते १५ टक्के रक्तस्राव झाल्यास स्वास्थ्याला फारसा धोका नसतो. त्या स्रावानंतर ताबडतोब काही रक्त देता आल्यास उत्तमच; पण तसे देणे शक्य झाले नाही, तर काही दिवसांच्या विश्रांतीनंतर शरीर त्या रक्ताची भरपाई करतच राहते. निरोगी आणि सुदृढ अशा तरुणाच्या शरीरात सरासरीने साडेपाच लिटर रक्त असते. त्याच्या दहा टक्के म्हणजे साधारण अर्धा लीटर रक्त; तेवढ्या रक्ताचा ऱ्हासही शरीर सहन करू शकते. उलट रक्तदानाच्या वेळी दात्याच्या शरीरातून पाव लीटर रक्त काढून घेतले जाते. त्यामुळे त्याची भरपाई होण्यास वेळ लागत नाही.

साधारण २४ तासांत ही भरपाई होत असते. तरीही एकदा रक्तदान केल्यानंतर दोन महिने परत रक्तदान करू दिले जात नाही. त्यामुळे पाव लीटर रक्त देण्याने कोणतेही नुकसान होत नाही. अर्थात ही झाली संपूर्ण रक्तदानाची प्रक्रिया. काही वेळा रुग्णासाठी केवळ प्लेटलेट्सची गरज असते. अशा वेळी डॉक्टर संपूर्ण रक्त काढून न घेता अफेरेसिस नावाच्या प्रक्रियेचा वापर करून फक्त प्लेटलेट्स काढून घेतात. त्यांची भरपाई तर त्याहीपेक्षा जलद गतीने होते. त्यामुळे एकदा प्लेटलेट्सचे दान केल्यानंतर तीनच दिवसांनी परत त्यांचे दान करता येते.

# जास्त जगण्याचे रहस्य



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जे लोक १०० वर्षे जगतात, ते कसे जगतात किंवा इतकी वर्षे जगण्यासाठी त्यांनी काय केले, हे जाणून घेण्याची उत्सुकता सगळ्यांमध्येच असते. कुणालाही असेच वाटते, की त्यांनी जास्तीत जास्त जगावे, १०० वर्षे जगावे.

आजकालची लाइफस्टाईल, खाणे-पिणे इतके बदलले आहे, की १०० वर्षे जगण्याचा विचारही कुणाच्या मनात येत नाही. पण जे लोक १०० वर्षे जगतात, ते कसे जगतात किंवा इतकी वर्षे जगण्यासाठी त्यांनी काय केले? हे जाणून घेण्याची उत्सुकता सगळ्यांमध्येच असते. जेणेकरून त्यांनाही त्या गोष्टी फॉलो करून इतके जगता यावे. तर १०० वर्षे कसे जगता येईल हे एका १०० वर्षांच्या डॉक्टरांनी सांगितले आहे. महिला डॉक्टर ग्लेडिस मॅकगॅरी यांचे वय १०३ वर्षे आहे. या वयातही त्या फार सक्रिय आहेत. त्यांनी ‘ द वेल **लिव्ह लाइफ :** ए १०३ ईअर ओल्ड डॉक्टर्स सीक्रेट्स टू हेल्थ ॲण्ड हॅपीनेस ॲट एवरी एज ’ नावाचे पुस्तक लिहिले आणि यात त्यांनी जास्त आयुष्य जगण्याचे रहस्य सांगितले आहे. अशात त्यांच्याइतके जगण्याचे रहस्य काय आहे? आणि त्याद्वारे आपणाला कसे जास्त जगता येईल, हे जाणून घेऊया.

**नवीन शिकत राहा :** आपल्यापैकी सगळ्यांनी काहीना काही नवीन शिकणे, पुढे जाणे आणि आपल्या क्वालिटी वाढविण्याचे काम केले पाहिजे. यामुळे तुम्ही सजग राहता.

**स्वतःवर प्रेम करा :** जगात प्रत्येक दोन पैकी एक व्यक्ती डिप्रेशनचा शिकार आहे. हे लोक स्वतःवर फार कमी प्रेम करतात. त्यामुळे जास्त जीवन जगण्यासाठी आधी तुम्ही स्वतः प्रेम करायला शिका.

**एनर्जी वाया घालवू नका :** तुमची एनर्जी अशा गोष्टीवर घालवा, जी गोष्ट तुम्हाला आवडते किंवा आनंद देते. हे काही फार अवघड काम नाही. जेव्हा या पद्धतीने आपण जीवन जगत असतो, तेव्हा खरंच आपण जीवन जगत असतो.

**काय खावे? :** प्लांट बेस्ड डाएट फॉलो केला पाहिजे. म्हणजे झाडांपासून बनलेले पदार्थ, हिरव्या पालेभाज्या, फळे इत्यादींचे सेवन केले पहिजे. तसेच भरपूर पाणी प्यायला हवे. याने तुमचे आयुष्य वाढू शकते.

# पिता की ‘ न ’ से की नई शुरुआत

## उधार के पैसों से बनाई वेबसाइट, आज है करोड़ों का कारोबार

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जयपुर से करीब २५० किलोमीटर दूर सरदारशहर राजस्थान का एक छोटा-सा कस्बा है, जो रंगीन फ्रेस्को पेंटिंग और नक्काशीदार लकड़ी के काम से सजी अपनी शानदार हवेलियों के लिए जाना जाता है। आज भी यह जगह अपनी अनोखी शीशम की लकड़ी के लिए मशहूर है। यहीं पर एक पुराने हवेलीनुमा घर के आंगन में कुछ कारीगर दिन भर शीशम की लकड़ी तराशते और एक दुबला पतला लड़का उनके बीच खड़ा होकर टकटकी लगाए उन्हें देखता रहता।

वर्षों बाद वही लड़का बड़े शहर पहुंचा। अच्छे कॉलेज में दाखिला लिया, अच्छी डिग्री हासिल की और लग गया नौकरी की जद्दोजहद में। पर उसके भीतर अब भी अपने आंगन की उस घिसाई-रंदाई की आवाज गूंजती थी। एक दिन उस लड़के के मन में विचार आया कि अगर दुनिया में बाकी चीजें ऑनलाइन हो सकती हैं, तो फिर हमारे कारीगरों की मेहनत क्यों नहीं? कुछ दोस्त हंसे भी और बोले फर्नीचर भी ऑनलाइन बिकेगा भला? मगर उसने इन पर ध्यान न देते हुए एक वेबसाइट बनवाई। शुरुआती कुछ दिनों तक कभी ऑर्डर ही नहीं आते, कभी आते तो भरोसे की कमी के चलते ग्राहक उत्पाद वापस कर देते। तकनीकी दिक्कतें भी आईं, और परिवार के भीतर भी फैसले को लेकर सवाल उठने लगे। लेकिन हर चुनौती को उसने एक सीख की तरह लिया।

धीरे-धीरे उसकी मेहनत रंग लाई और आज उसकी पहल ने न सिर्फ पारंपरिक कारीगरों को नई पहचान दी, बल्कि बिजनेस को एक वैश्विक ब्रांड के रूप में स्थापित किया। आज लोग उस लड़के को इनसराफ डॉट कॉम के संस्थापक रघुनंदन सराफ के रूप में जानते हैं। रघुनंदन की कहानी युवाओं के लिए एक संदेश है कि सीमित संसाधनों के बावजूद न सिर्फ बड़े सपने देखे जा सकते हैं, बल्कि उन्हें पूरा भी किया जा सकता है।

### पिता को नहीं था भरोसा

रघुनंदन सराफ ने सरदारशहर के एक स्थानीय स्कूल से कक्षा छह तक की पढ़ाई की। इसके बाद उन्होंने बारहवीं तक की पढ़ाई जयपुर के रयान इंटरनेशनल स्कूल से की। रघुनंदन ने बारहवीं के बाद दिल्ली के श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्स से बीकॉम किया और २००९ में एमबीए पूरा किया। उनका परिवार लगभग चालीस वर्षों से लकड़ी से बने फर्नीचर का कारोबार कर रहा था। व्यापार चल तो रहा था, पर वह सीमित ग्राहकों और पुरानी सोच की दीवारों में कैद था। उनके पिता और चाचा देश के अलग-अलग हिस्सों में फर्नीचर बेचते थे। 1998 तक परिवार ने फर्नीचर का एक्सपोर्ट करना भी शुरू कर दिया था। छोटे शहर से बिजनेस को बड़े पैमाने पर बढ़ाना आसान नहीं था। इसीलिए उन्होंने अपने पिता को सुझाव दिया कि धंधे में तकनीक का इस्तेमाल किया जाए और ऑनलाइन बिक्री शुरू की जाए, पर पिता ने मना कर दिया, क्योंकि उन्हें बेटे पर भरोसा नहीं था।

### हजार कर्मचारियों की टीम

रघुनंदन के भीतर बिजनेस में कुछ नया आजमाने का जज्बा था। वह इसे रिटेल तक ले जाना चाहते थे। इसके लिए उन्होंने अपने दोस्तों से ५० हजार रुपये उधार लिए और २०१४ में फैक्टरी के एक कोने में छोटा-सा ऑफिस बनाकर ऑनलाइन फर्नीचर बेचने का काम शुरू किया। इसके लिए उन्होंने एक वेबसाइट बनवाई। उनका ऑफिस अब भी सरदारशहर में ही है, लेकिन पहले का वह छोटा-सा कोना अब एक बड़े और आधुनिक ऑफिस में बदल चुका है। शुरुआत में जहां सिर्फ तीन लोग काम करते थे, वहीं आज कंपनी में करीब एक हजार कर्मचारी काम कर रहे हैं। खास बात यह है कि उनकी कंपनी में सैकड़ों कर्मचारी एलजीबीटी समुदाय से हैं।

### बिजनेस के दो मॉडल

रघुनंदन सराफ का सफर चुनौतियों से भरा रहा, क्योंकि सरदारशहर जैसे छोटे शहर में लॉजिस्टिक्स जैसी बुनियादी सुविधाएं बेहद सीमित थीं। उन्होंने अलग-अलग लॉजिस्टिक्स कंपनियों को समझाया, उन्हें भरोसा दिलाया और धीरे-धीरे उन्हें वहां से काम शुरू करने के लिए तैयार किया। इसके साथ ही ऑनलाइन ऑर्डर, बिक्री और फर्नीचर को सुरक्षित तरीके से ग्राहकों तक पहुंचाना भी एक चुनौती थी। इसके लिए उन्होंने एक सक्षम और भरोसेमंद टीम बनाई। आज वह ६००० से ज्यादा उत्पादों का कारोबार करते हैं। इनसराफ दो बिजनेस मॉडल पर चलता है, पहला डायरेक्ट-टू-कंज्यूमर, जिसमें वेबसाइट के जरिये सीधे ग्राहकों को फर्नीचर बेचा जाता है और दूसरा बिजनेस-टू-बिजनेस, जिसके तहत होटल और रिसॉर्ट्स को फर्नीचर सप्लाई की जाती है।

### युवाओं को सीख

छोटे शहर से भी बड़े सपने पूरे किए जा सकते हैं।

परंपरा और नवाचार को मिलाकर सफलता हासिल करें।

चुनौतियों को अवसर में बदलने का हौसला रखें।

सीखते रहने और बदलते रहने की आदत सफलता दिलाती है।

लगन और मेहनत से कोई भी लक्ष्य पाया जा सकता है।



# बीटरूट खाण्याचे फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बीटरूट ही प्रत्येक हंगामात उपलब्ध असलेली भाजी आहे. ते सॅलड किंवा ज्यूसच्या स्वरूपात खातात. त्यात फोलेट आणि मॅंगनीज मुबलक प्रमाणात असते, जे हृदय निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक असतात. तर फोलेट हे मेंदूसाठी फायदेशीर आहे. याशिवाय बीटरूट मध्ये अनेक जीवनसत्त्वे आणि खनिजे आढळतात, जे आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर असतात. या भाजीचे आहारात अवश्य सेवन करा.



**मेंदूला तीक्ष्ण बनवते :** बीटरूट मध्ये नायट्रेट्स असतात जे वाढलेले रक्तदाब कमी करण्यास मदत करतात. तसेच रोज याचे सेवन केल्यास हृदयाशी संबंधित समस्यांचा धोका कमी होतो. बीटरूट खाल्ल्याने मेंदू निरोगी राहतो आणि तीक्ष्ण बनतो.

**रक्ताची शरीरातील पातळी ठीक राहते :** बीटरूट मध्ये लोह आणि खनिजे आढळतात, जे शरीरातील अशक्तपणा दूर करण्यास मदत करतात. दररोज बीटरूटच्या सेवनाने हिमोग्लोबिनची कमतरता होत नाही. ज्यामुळे ऑक्सिजनची पातळी आणि रक्ताची पातळी शरीरात ठीक राहते.

**कोलेस्टेरॉल :** बीटचा ज्यूस रोज प्यायल्याने खराब कोलेस्टेरॉल निघून जाते. त्यामुळे ते रक्तवाहिन्यात जमा होत नाही आणि लठ्ठपणा, हृदयाशी संबंधित समस्यांपासून बचाव होतो.

**चेहऱ्यावर ग्लो येतो :** दररोज बीटरूटचा रस प्यायल्याने त्वचा निरोगी होते, एवढेच नाही तर चेहऱ्यावर ग्लो येतो.

# उशीलाही असते एक्सपायरी डेट ?

## पाहा उशी बदलण्याची योग्य वेळ, नाहीतर द्याल अनेक आजारांना आमंत्रण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या नेहमीच्या वापरातील काही वस्तूंना एक्सपायरी डेट असते. आपण अनेकदा अन्नपदार्थ, औषधे किंवा मेकअप तसेच अनेक ब्यूटी प्रॉडक्ट्सची एक्स्पायरी डेट तपासून पहातो. आपण रोज झोपताना वापरत असलेली उशी आपल्याला आरामदायी झोप देण्यासाठी किती महत्त्वाची असते हे आपल्या सगळ्यांनाच माहित आहे, पण तुम्हाला माहिती आहे का, उशीला देखील एक्स्पायरी डेट असते? होय, दीर्घकाळ वापरल्याने उशीतील कापूस, फोम किंवा फायबर खराब होऊन उशी मळकी व अतिशय घाण होते उशीचा आकार, मऊपणा आणि स्वच्छता नसल्याने अशा उशीवर झोपल्याने मानदुखी, पाठीचा त्रास, ॲलर्जी, पिंपल्स किंवा स्किन इंफेक्शनसारखे प्रॉब्लेम्सही होऊ शकतात. वर्षानुवर्षे एकाच उशीचा वापर केल्यास, तिच्यात घाम, डेड स्किन सेल्स, तेलकट घटक,



धूळ आणि जंतू यांचा थर जमा होतो. हे सर्व घटक बॅक्टेरियाची वाढ करतात, ज्यामुळे अनेक समस्या होऊ शकतात. यासाठीच, वेळोवेळी उशीची स्वच्छता राखणे आणि तिची एक्स्पायरी डेट ओळखणे अत्यंत गरजेचे असते. तुमची आवडती उशी कधी बदलायची हे ओळखणे खूप गरजेचे असते.

### उशीची एक्स्पायरी डेट कधी झाली आहे हे ओळखण्यासाठी सोप्या टिप्स पाहूया...

उशी ठरेल आरोग्यासाठी धोकादायक : वर्षानुवर्षे आपली तीच एक आवडती उशी वापरल्याने तुम्हाला आरोग्याच्या अनेक त्रासदायक समस्या होऊ शकतात. उशी ही बेडरूममधील अशी वस्तू आहे, जिच्या संपर्कात आपला चेहरा आणि त्वचा दररोज सुमारे ८ ते १० तास असतात. डॉक्टरांनी एका व्हिडिओमध्ये सांगितले आहे, की जेव्हा आपण झोपलेले असता तेव्हा चेहऱ्यावरील डेड स्किन, लाळ, त्वचेतील नैसर्गिक तेल आणि धुळीचे कण उशीवर एकत्रित गोळा होतात. दीर्घकाळ अशी उशी वापरल्याने या सर्वांचा थर उशीवर जमा होत जातो. अशा परिस्थितीत, जर उशी वेळेवर स्वच्छ केली नाही किंवा बदलली नाही, तर यावर जमा झालेली धूळ आणि घाण पिंपल्स, ॲलर्जी आणि जळजळ यांसारख्या समस्या होऊ शकतात. इतकेच नाही तर, यामुळे फुफ्फुसांना देखील नुकसान पोहोचू शकते. ब्रेकजदा उशा पॉलीयुरेथेन फोमसारख्या कृत्रिम साहित्यापासून तयार करतात. कालांतराने या उशीतून हानिकारक कार्बनिक संयुगे बाहेर पडतात. ज्यामुळे परिस्थिती आणखी बिघडते. जर एखादी व्यक्ती दीर्घकाळ गलिच्छ उशीच्या संपर्कात राहिली, तर तिला फुफ्फुसांमध्ये घातक संक्रमण होण्याचा धोका असतो.

### उशीची एक्स्पायरी डेट संपली आहे हे नेमके कसे ओळखायचे?

डॉक्टरांनी त्यांच्या व्हिडिओमध्ये सांगितल्याप्रमाणे उशीची ‘ एक्स्पायरी डेट ’ ही तुम्ही वापरत असलेल्या उशीच्या प्रकारावर अवलंबून असते. म्हणजेच, पॉलिस्टर, फेदर, फोमपासून बनवलेल्या उशांची एक्स्पायरी डेट वेगवेगळी असू शकते. पॉलिएस्टर ६ ते २४ महिने, फेदर १ ते ३ वर्षे, मेमरी फोम २ ते ३ वर्षे, लेटेक्स ३ ते ४ वर्षे, बकवीट ३ ते ५ वर्षे अशा प्रकारे उशीच्या वेगवेगळ्या फोमनुसार तिची एक्स्पायरी डेट देखील वेगळी असते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

पान १ वरून

## मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र कागदावरच

त्या नंतर बांधकाम विभागाचे आर्किटेक्चर व कार्यकारी अभियंत्यांनी टाकरखेडा रस्त्यावर जिल्हा प्रशासनाने दिलेल्या दोन एकर जागेची प्रत्यक्ष पाहणी न करता दीड कोटी रुपयांच्या अभ्यास केंद्राचा आराखडा व अंदाजपत्रक तयार करून ई-निविदा प्रक्रिया राबवली. हे काम नाशिक येथील ठेकेदाराला देण्यात आले. त्यानंतर ५ ऑगस्ट २०२४ रोजी उच्च व तंत्रज्ञान शिक्षणमंत्री ना. चंद्रकांत पाटील, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, माजी मंत्री आमदार अनिलदादा पाटील, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत या अभ्यास केंद्राच्या कामाचे भूमिपूजन झाले. त्यावेळी मंत्री ना. चंद्रकांत पाटील यांनी भाड्याच्या खोलीत अभ्यास केंद्र सुरू करण्याचे आदेश दिले होते. तसेच कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी अभ्यास केंद्राचे बांधकाम आठ महिन्यात पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, ज्या ठिकाणी केंद्र होणार होते ती जागा उंचावर होती. तसेच या ठिकाणी सर्वत्र मुरुम असल्याचे लक्षात आले. त्यामुळे अभ्यास केंद्राची वास्तू उभारणे शक्य नव्हते. ही बाब विद्यापीठाच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता व आर्किटेक्चरच्या लक्षात आले. त्यानंतर विद्यापीठाने पुन्हा जिल्हा प्रशासनाकडे दोन एकर अतिरिक्त जागा मिळविण्यासाठी पाठपुरावा केला. त्यामुळे १६ महिन्यापासून अभ्यास केंद्राचे काम रखडले आहे.

## सेवेकऱ्यांसाठी अपघाती विमा योजना

इंद्रजीत संजीव पाटील, राहुल प्रकाश मिस्तरी व चेतन कैलास गोसावी यांनी सेवेकऱ्यांना दिली. त्यानंतर सेवेकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विमा योजनेच्या सहभागाचे अर्ज भरले. मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर, खजिनदार गिरीश कुलकर्णी यांच्यासह मनोहर तायडे, योगेश पाटील, रजनीकांत पाटील यावेळी उपस्थित होते. जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

# बसस्थानक ते तहसील कार्यालय रस्ता स्वच्छतागृहाविनाच!

### पालिका प्रशासनाचे कमालीचे दुर्लक्ष; गर्भवतीवर ओढवले गंभीर संकट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील बसस्थानक ते तहसील कार्यालय दरम्यानचा रस्ता सर्वांच्याच दृष्टीने अतिशय वर्दळीचा व महत्त्वपूर्ण आहे. मात्र या संपूर्ण रस्त्यालगत एकाही ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृह अथवा मुतारीची सुविधा नाही. त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. ग्रामीण भागातून शहरात कामानिमित्त येणारे नागरिक, शालेय विद्यार्थी, महिला व तरुणी याच मार्गाने नियमित ये-जा करत असतात. त्यात त्यांना स्वच्छतागृहाची आवश्यकता भासल्यास पुन्हा बसस्थानक गाठण्याशिवाय पर्याय नसतो किंवा थेट तहसील कार्यालयाकडे धाव घ्यावी लागते. धक्कादायक बाब म्हणजे तहसील कार्यालय आवारात स्वतंत्र मुतारीची सोयच नसल्याने अनेकदा नागरिकांना उघड्यावरच विधी करावा लागत असल्याचे चित्र दिसून येते. बसस्थानक व तहसील कार्यालयादरम्यान असलेल्या पंचायत समिती सभापतींच्या जुना बंगला परिसरातही उघड्यावर विधीचे प्रकार सातत्याने दिसून येतात. त्यामुळे या परिसरात पालिका प्रशासनाने गंभीरतेने दखल घेऊन सार्वजनिक स्वच्छतागृह उभारावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. पुरुष कशीबशी आपली गरज उघड्यावर




भागवतात. मात्र महिला, तरुणी व विद्यार्थिनींची सार्वजनिक स्वच्छतागृहाअभावी मोठी गैरसोय होते. त्यांनाही थेट बसस्थानकच गाठावे लागते किंवा आजूबाजूच्या शाळा, खासगी संस्था अथवा कार्यालयांमधील स्वच्छतागृहांचा आधार घ्यावा लागतो. मंगळवार, दि. २३ जानेवारी रोजी दुपारी एक अत्यंत धक्कादायक व माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली. खासगी कामानिमित्त शहरात आलेली एक गर्भवती महिला धुळे-अमळनेर रस्त्यावरील श्री स्वामी समर्थ महाराज केंद्राकडील प्रवेशद्वाराजवळ उभी होती. तेव्हा तिला अतिशय तीव्र स्वरूपाचा त्रास सुरू झाला. त्यात वेदना होऊन पोटात जोरदार कळा येऊ लागल्या. त्यामुळे तिची अवस्था अतिशय गंभीर झाली होती. ती कशीतरी धावाधाव करत बसस्थानकात पोहोचली. मात्र तेथेही सार्वजनिक स्वच्छतागृहाची साफसफाई सुरू होती. त्यामुळे तिने पुन्हा श्री स्वामी समर्थ महाराज केंद्राकडे धाव घेतली. परंतु दुपारच्या सुमारास तेथील प्रवेशद्वारही बंद असल्याने तिची घोर निराशा झाली. त्यामुळे तिने त्याच अवस्थेत आपल्या पतीला फोन केला. पतीही खासगी कामानिमित्ताने शहरात आलेले होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन ते तत्काळ काही वेळातच संबंधित ठिकाणी पोहोचले. त्यांनी तत्काळ पत्नीला मोटारसायकलवर बसवून जवळच्या खासगी शाळेच्या प्रवेशद्वारापर्यंत नेले व तेथील स्वच्छतागृह वापरण्याचा मार्ग दाखविला. यामुळे संबंधित महिला मोठ्या संकटातून सावरली. या प्रकारामुळे शहरातील या मूलभूत सुविधेच्या अभावाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या प्रकाराची पालिका प्रशासनाने गंभीरतेने दखल घेऊन बसस्थानक ते तहसील कार्यालय या मुख्य व वर्दळीच्या रस्त्यानजीक लवकरात लवकर महिला व पुरुषांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृह व स्वतंत्र मुताऱ्या उभाराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# भरवस-बेटावद शिवारातून ३२ हजारांची वीजतार लंपास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील भरवस शिवारातून चोरट्याने २६०० मीटर लांबीची वीजतार चोरून नेली. या प्रकरणी गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

लाईनमन अशोक वसावे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार भरवस ते बेटावद रस्त्यावरील भरवस शिवारात २२ ते २३ डिसेंबर दरम्यान चोरट्याने वीजतार चोरून नेली. या प्रकाराची माहिती मिळाल्याने फिर्यादी घटनास्थळी गेले असता ३२ हजार रुपये किमतीची २६०० मीटर लांब ॲल्युमिनिअम तार चोरीस गेल्याचे उघड झाले. याबाबत मारवड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस शिपाई संजय सूर्यवंशी तपास करीत आहेत.





## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234



# प्रा. डॉ. प्रभाकर जोशी सर सूर्योदय जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जळगाव येथे एम जे कॉलेज प्रांगणात दिनांक २० व २१ डिसेंबर रोजी आयोजित राज्यस्तरीय तिसरे सूर्योदय मराठी साहित्य संमेलनात अमळनेर येथील प्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. प्रभाकर जोशी सरांनी केलेल्या साहित्यिक. शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याबद्दल सूर्योदय जीवन गौरव पुरस्कार प्रसिद्ध गझल सम्राट भीमराव पांचाळ व संमेलनाध्यक्ष डॉ. म .सु. पगारे साहित्यिक डॉ. सतीश बडवे सतीश जैन इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. जोशी हे संत साहित्य भाषाविज्ञान या क्षेत्रातील अभ्यासक आहेत त्यांचे वचनामृत भागवत कथा पुराण साहित्य विचार वर्णनात्मक भाषाविज्ञान.यासारखे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. अमळनेर येथील मराठी वाङ्मय मंडळाच्या उभारणीत त्यांचे मोठे योगदान आहे. हा पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे

# उदयनगर येथे महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील उदयनगर येथील समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामपंचायत व जानवे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. त्यास उदयनगरसह परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात डॉ. गिरीश गोसावी (तालुका आरोग्य अधिकारी, अमळनेर), डॉ. संजय रनाळकर (वैद्यकीय अधिकारी, जानवे), डॉ. रिया सिसोदे (वैद्यकीय अधिकारी, जानवे) तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, जानवे येथील आरोग्य कर्मचाऱ्यांनी एकूण ३२४ महिलांची तपासणी केली. यामध्ये ॲनिमियामुक्त भारत अभियानांतर्गत ७२ महिलांच्या रक्त तपासण्या करण्यात आल्या. तसेच २५२ महिलांचे एनसीडी (असंसर्गजन्य आजार) स्क्रीनिंग करण्यात आले.लोकनियुक्त सरपंच प्रकाश वाघ, ज्येष्ठ नागरिक भालेराव वाघ, ग्रामपंचायत सदस्य



राजेंद्र कापडणे, सुदाम सोनवणे, ग्रामपंचायत सदस्या सीमा पाटील, संगीता बैसाणे, मीराबाई पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश पाटील, ग्रामविकास अधिकारी तसेच ग्रामपंचायत कर्मचारी राकेश कापडणे, सुभाष पाटील, रोजगार सेवक सागर सोनवणे आदी यावेळी उपस्थित होते.

# फोनवरून ठार मारण्याची वकिलास धमकी

### कडक कारवाईच्या मागणीसाठी अमळनेर वकील संघाचे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील वकील संघाचे सदस्य ॲड. मंगेश देविदास पाटील यांना फोनवरून ठार मारण्याची धमकी देत अरेरावीची भाषा वापरली. हा गंभीर प्रकार शिरूर (जि. पुणे) येथे मंगळवार, दि. २३ डिसेंबर रोजी दुपारी घडली. या प्रकाराची गंभीरतेने दखल घेऊन संबंधित आरोपींवर कायदेशीररीत्या कारवाई व्हावी, यासाठी बुधवार, दि. २४ डिसेंबर रोजी येथील वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय दंडाधिकारी तथा प्रांताधिकाऱ्यांना निवेदन दिले.



ॲड. मंगेश देविदास पाटील यांनी प्रणोती देविदास चिमूरकर यांना कायदेशीर नोटीस बजावली होती. या कारणातून प्रदीप राज कुलकर्णी (रा. शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी मंगळवार, दि. 23 डिसेंबर रोजी दुपारी फोनवरून ॲड. पाटील यांना कोर्टात काम करताना ठार मारू, अशी धमकी दिली तसेच अरेरावीची भाषाही केली. या पार्श्वभूमीवर बुधवार, दि. २४ डिसेंबर रोजी अमळनेर वकील संघाची तातडीची बैठक घेण्यात आली. त्यात सदर प्रकाराचा तीव्र निषेध नोंदविण्यात आला. निवेदनात महाराष्ट्रात वकिलांवर हल्ले होणे व ठार मारण्याच्या धमक्या देणे यासारख्या घटनांमध्ये वाढ होत आहे. काही वकील बांधवांना आपला जीवही गमवावा लागला आहे. त्यामुळे शासनाने वकील संरक्षण कायदा त्वरित लागू करावा. अमळनेर वकील संघातील सर्व सन्माननीय सभासदांच्या सह्या असलेले निवेदन प्रांताधिकाऱ्यांऐवजी तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांनी स्वीकारले. यावेळी ॲड. आर. व्ही. निकम, ॲड. शिवकुमार ससाणे, ॲड. शेखर खैरनार, ॲड. आर. डी. कचवा, ॲड. गोपाल सोनवणे, उदय सिसोदे, ॲड. मनीष पाटील आदींसह अनेक वकील उपस्थित होते.

# संशोधन व नवनिर्मिती हे व्यावसायिक शिक्षणाचे अविभाज्य घटक : दादासाहेब पानगव्हाणे

### खा. शि. मंडळाच्या फार्मसी महाविद्यालयास भेटीप्रसंगी व्याख्यान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : स्पर्धेच्या युगात आर्टिफिशियल इंटेलिजन्स व डिजिटल तंत्रज्ञानामुळे शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन क्रांती घडत आहे. त्यात संशोधन व नवनिर्मिती हे व्यावसायिक शिक्षणाचे अविभाज्य घटक बनले आहेत, असे प्रतिपादन सिप्ला लिमिटेड कंपनीचे संचालक दादासाहेब पानगव्हाणे यांनी केले.

खान्देश शिक्षण मंडळ संचलित येथील फार्मसी महाविद्यालयात झालेल्या व्याख्यानात ते बोलत होते. ते म्हणाले की, माझ्या आयुष्यातील यशाच्या प्रवासात आवश्यक असलेल्या आत्मविश्वासाची पायाभरणी माझ्या विद्यार्थीदशेतच प्राचार्य डॉ. रवींद्र सोनवणे यांनी केली. त्यामुळेच आज उच्च शिखरापर्यंत पोहोचणे शक्य झाले. यावेळी प्राचार्य डॉ. सोनवणे यांनी प्राध्यापकांसोबत झालेल्या चर्चेदरम्यान अभ्यासू वृत्ती, कल्पकता, नावीन्याची आवड, ध्येयप्राप्तीची जिद्द व कठोर परिश्रम यांची तयारी असेल, तर जीवनात यश निश्चित मिळते, असे मत व्यक्त केले. खान्देश शिक्षण मंडळाचे संचालक व फार्मसी विभागाचे चेअरमन योगेश मुंदडे यांनी मनोगतात प्राचार्य डॉ. सोनवणे यांनी औषधनिर्माण क्षेत्रातील दादासाहेब पानगव्हाणे यांच्यासारख्या नामवंत व्यक्तींना महाविद्यालयात पाचारण करून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व संशोधनात्मक दृष्टिकोन सदैव जागृत ठेवावा, असे सांगितले. वरिष्ठ प्राध्यापक अनिल बोरसे यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. यावेळी पदविका व पदवी फार्मसीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रा. देवेश भावसार व सर्व शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले. प्रा. हर्षदा पवार यांनी आभार मानले.

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले

महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!

डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# खरमासमधील पंचकामुळे होणार द्विगुण दोष

## • या पाच राशींच्या लोकांवर ओढावू शकते आर्थिक संकट...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सूर्य धनू राशीत असताना खरमास सुरू होतो. या महिन्यात लग्न, गृहप्रवेश समारंभ, पवित्र धागा विधी किंवा नवीन उपक्रमांची सुरूवात यासारखे कोणतेही शुभ किंवा शुभ कार्यक्रम केले जात नाहीत. यावर्षी पंचक या खरमास दरम्यान होत आहे. हिंदू धर्म आणि ज्योतिषशास्त्रात पंचक अशुभ मानला जातो. या काळात कोणतेही शुभ कार्य केले जात नाही.

खरमास दरम्यान पंचक येणे अत्यंत अशुभ मानले जाते. यावर्षी खरमास १६ डिसेंबर २०२५ रोजी सुरू झाला. १४ जानेवारी २०२६ पर्यंत चालेल. दरम्यान पंचक २४ डिसेंबर २०२५ रोजी सुरू होतो आणि २९ डिसेंबर २०२५ पर्यंत चालेल. ज्योतिषशास्त्रानुसार जेव्हा खरमास दरम्यान पंचक येतो तेव्हा पंचकाचे पाच दिवस द्विगुण दोषाचा काळ मानला जातो. त्यामुळे काही ठराविक राशींच्या लोकांनी या काळात सावधगिरी बाळगली पाहिजे.

**वृषभ राशी :** वृषभ राशीच्या लोकांना या काळात दु:खाची भावना येऊ शकते. मानसिक शांतीसाठी योगासने आणि ध्यान करा. ऑफिसमध्ये कामाचा ताण जास्त असेल. व्यवसायात मोठे धोके पत्करणे टाळा. खर्च वाढेल. तसेच घरात किंवा बाहेर वाद घालणे टाळा.

**कर्क राशी :** चंद्राच्या स्थितीमुळे पंचक सुरू होतो. चंद्र कर्क राशीचा स्वामी आहे. या काळात कर्क राशीच्या लोकांनी विशेष काळजी घ्यावी. बोलण्यावर किंवा वागण्यावर नियंत्रण ठेवावे. समस्या तुम्हास त्रास देतील. खर्चावर नियंत्रण ठेवावे, नाहीतर कर्जबाजारी होण्याची वेळ येऊ शकते. समोर आव्हाने असतील.

**धनू राशी :** हा काळ धनू राशीसाठी चढ-उतार घेऊन येतील. घरात काही समस्या असतील. कामाच्या ठिकाणी आव्हाने देखील उद्भवू शकतात. त्यामुळे नवीन नोकरी शोधण्याची वेळ येऊ शकते. नकारात्मकतेपासून दूर राहा. व्यावसायिकांना तीव्र स्पर्धेचा सामना करावा लागू शकतो. आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

**मीन राशी :**

मीन राशीच्या लोकांनी या काळात स्वत:च्या आणि कुटुंबातील सदस्यांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. प्रवास करत असाल तर सामानाची सुरक्षितता सुनिश्चित करा. व्यवसायातील नफ्यात चढ-उतार होतील. जोडीदाराशी संघर्ष किंवा मतभेद होण्याची शक्यता आहे.




# पांडुरंग विटेवरी का ?

## ' मातृ-पितृ भक्तीमुळे भगवान श्रीकृष्ण झाले प्रसन्न '

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पंढरपुरात विटेवर विराजमान ' भगवान विठ्ठल ' संपूर्ण महाराष्ट्राचे श्रद्धास्थान आहेत. देव स्वतः भेटीला आले अन् भक्ताची भक्ती पाहून आनंदाने येथेच स्थायिक झाले. काय आहे? भगवान विठ्ठलाची कथा काय आहे आणि भक्त पुंडलिक कोण होता? जाणून घेऊया.

प्राचीन काळात पुंडलिक नावाचा गृहस्थ पंढरपूर भागात राहत होता. त्याला त्याच्या पत्नीवर फार प्रेम होते. निव्वळ प्रेम नव्हे; तर अंध प्रेम. या प्रेमात बुडालेला पुंडलिक त्याच्या आई-बाबांकडेही दुर्लक्ष करत असे. पुंडलिकाला देवभक्तीची फार आवड होती. एकदा काशीला मोक्षप्राप्तीसाठी जात असताना तो वाट चुकला आणि एका आश्रमात येऊन पोहोचला. तेथील ऋषींना त्याने विचारले, की काशीला जाणारी वाट दाखवावी. ऋषींनी त्याला ती वाट ठाऊक नसल्याचे सांगून ते कधीही काशीला गेले नाहीत, असे कारण सांगितले. पुंडलिकाला हसू आवरले नाही. त्याने हसता-हसता ऋषींना सांगितले, की ' तुम्ही एक ऋषी असून तुम्ही कधी काशीला गेला नाहीत. मग तुम्ही कसले ऋषी. ' असे म्हणत तो त्याच्या वाटेला लागला.

आश्रमापासून थोड्या अंतरावर जाताच त्याला आश्रमाकडून काही महिलेच्या हसण्याचा आवाज आला. पुंडलिक पुन्हा मागे वळला. आश्रमात जाऊन पाहतो तर काय? तेथे तीन स्त्रिया आश्रम स्वच्छ करत होत्या. त्या स्त्रिया म्हणजे दुसऱ्या-तिसऱ्या कुणी नसून स्वतः गंगा, यमुना आणि सरस्वती होत्या. ' काशीला न जाता या ऋषींच्या आश्रमात आणि भाग्यात इतके पावित्र्य आले तरी कुठून?' असा प्रश्न त्यांनी केला. तेव्हा त्या मातांनी त्याला उत्तर दिले, की ' या ऋषींनी आयुष्यभर त्यांच्या माता- पित्याची सेवा केली. त्यांची निस्सीम भक्ती केली. त्यामुळे त्यांच्या पदरात हे पावित्र्य आले आहे. मोक्ष मिळविण्यासाठी कुण्या धार्मिकस्थळी जाण्यापेक्षा



व्यक्तीचे कर्म महत्त्वाचे असतात.'

हे बोल ऐकून पुंडलिकाचे डोळे उघडले. त्याला त्याच्या आई-वडिलांची काशीला नेण्याची विनंती आठवली. पुंडलिक तसाच मागे फिरला आणि घराकडे गेला. आई-वडिलांना सोबत घेऊन त्याने त्यांना काशीचे दर्शन घडविले. आई-वडिलांची निस्सीम भक्ती केली. या भक्तीला पाहून स्वतः देवालाही राहवले नाही. स्वतः भगवान श्रीकृष्ण पुंडलिकाच्या भेटीसाठी आले. तेव्हा पुंडलिक आई-वडिलांच्या सेवेत रमलेला होता. त्याने वळून पाहिले तर मागे साक्षात भगवान श्रीकृष्ण उभे होते. पण पुंडलिक तेव्हा आई-वडिलांच्या सेवेत तल्लीन असल्याने त्याने देवालाही प्रतीक्षा करायला सांगितले. देवाला वीट दिली आणि त्याला त्यावर काही काळ विराजमान होण्यासाठी सांगितले.

सेवा पूर्ण झाल्यानंतर त्याने देवाची माफी मागितली. पण देव पुंडलिकाची मातृ-पितृ भक्ती पाहून प्रसन्न झाले होते. या प्रसन्नतेने देवाने त्याला वरदान मागण्यास सांगितले. पुंडलिकाने देवाला प्रतीक्षा करायला लावल्याने तो दुखावला होता. मात्र देव त्याला निसंकोचपणे वरदान मागण्यास सांगतो. तेव्हा पुंडलिक भगवान श्रीकृष्ण यांना ' भक्तांची काळजी करण्यासाठी पृथ्वीवर स्थायिक होण्यास सांगतो. ' तेव्हा विटेवर उभे असलेले भगवान विठ्ठल जेथे स्थायिक होते ते ठिकाण म्हणजे आजचे पंढरपूर. मुळात पंढरपूरमध्ये स्थित असलेली श्री विठ्ठलांची मूर्ती स्वयंभू आहे. कोणत्याही शिल्पकाराने त्याला घडविले नाही.

# दत्तोपासनेचे संजीवक

# श्रीनृसिंह सरस्वती



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री गुरुदेव दत्त हे परमेश्वराचा ' अनंत कालाचा अनंत भावाचा । अनंत जीवाचा कनवाळू ' अवतार आहेत. ' नाश कल्पान्तीही असेना ' असा हा अवतार आहे. ' नाना अवतार होऊनिया गेले । दत्तत्व संचले जैसे तैसे ।' अशी या अवताराची थोरवी प्रज्ञाचक्षू गुलाबमहाराज वर्णन करतात. हा अवतार ' भोगमोक्षसुखप्रदः ' आहे. श्रीपाद श्रीवल्लभ हा श्रीदत्तप्रभूंचा दुसरा अवतार. ' कलौ श्रीपाद श्रीवल्लभः ' अशी या अवताराची ख्याती आहे. श्रीनृसिंह सरस्वती हे श्रीदत्तप्रभूंचे तिसरे आणि श्रीपाद श्रीवल्लभांचे उत्तरावतार आहेत. तेच पुढे श्री अक्कलकोट स्वामी समर्थ म्हणून प्रसिद्धी पावले.

श्रीनृसिंह सरस्वती दत्तोपासनेचे संजीवक होते. तेराव्या शतकाच्या अखेरीस दत्तोपासनेच्या पुराणप्रवाहात संजीवन ओतण्याचे कार्य श्रीनृसिंह सरस्वतींनी केले. समग्र महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात ते दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरले.
श्री नृसिंह सरस्वतीचा अवतार काल शके १३०० ते १३८० (इ.स. १३७८ ते १४५८) असा आहे. श्रीगुरुचरित्र हा अपूर्व ग्रंथ दत्तसंप्रदायाचा वेदतुल्य, प्राणप्रिय ग्रंथ आहे. प्रापंचिकांचा आणि पारमार्थिकांचा तो मनोकामना पूर्ण करणारा चिंतामणीच आहे. या वेदतुल्य गुरुचरित्राचे चरित्रनायक आहेत. श्री नृसिंह सरस्वती. श्री गुरुचरित्रात अध्याय ११ ते ५१ या अध्यायात त्यांचे समग्र लीलाचरित्र आलेले आहे. श्री नृसिंह सरस्वती संन्यासधर्माचे सर्वोत्तम आदर्श होते.

**नृसिंह सरस्वती स्वामी**

श्री नृसिंह सरस्वती स्वामी मातेकडे भिक्षा मागताना श्रींचा जन्म व बालपण.
पूर्वावतार श्रीपाद श्रीवल्लभांच्या कृपाशीर्वादाने शनी प्रदोष व्रत करून शिवोपासना करणारी कुरूगड्डीची अंबाबाई वऱ्हाड प्रांतात, करंज नगरात वाजसनेय शाखेच्या ब्राह्मणाची सुकन्या होऊन जन्माला आली. याही जन्मी तिचे नाव ' अंबा ' असेच ठेवण्यात आले. पूर्वसंस्कारानुरूप ती या जन्मीसुद्धा शिवभक्ती करू लागली. त्याच ग्रामातील माधव नामक शिवोपासक तरुणाशी तिचा विवाह झाला. विवाहोत्तर तिचे मूळचे ' अंबा ' हेच नाव कायम ठेवण्यात आले. हे ईश्वर-निष्ठदाम्पत्य श्री शिवोपासनेत मग्न असतानाच श्रीदत्तप्रभूंनी वचन दिल्याप्रमाणे पौष शुद्ध द्वितीयेला, शनिवारी माध्यान्हकाळी त्यांच्यापोटी सुपुत्र रूपाने अवतार धारण केला- हेच श्री नृसिंह सरस्वती होत.

**जन्म होताचि ते बालक । ॐ कार शब्द म्हणतसे अलौकिक**
**पाहून झाले तटस्थ लोक । अभिनव म्हणोनि तये वेळी ॥**
**जन्मताच ते ॐ चा जप करू लागले.**

> ***जन्म :*** *लाडाचे कारंजा, पौष शुद्ध इ. स. १३७८* ***आई/वडील :*** *आंबामाता/ माधव* ***वेष :*** *संन्यासी* ***मुंज :*** *इ. स. १३८५* ***गुरू :*** *कृष्णसरस्वती* ***संन्यास :*** *इ. स. १३८८* ***तीर्थाटन :*** *इ. स. १३८८ ते १४२१* ***औदुंबर चातुर्मास :*** *इ. स. १४२१* ***नरसोबावाडी :*** *इ. स. १४२२ ते १४३४* ***गाणगापूर :*** *इ. स. १४३५ ते १४५८* ***कार्यकाळ :*** *इ.स. १३७८ ते १४५८* ***निजानंदीगमन :*** *इ. स. १४५८* ***विशेष :*** *दत्तावतार, धर्मसंस्थापनेचे कार्य चरित्र ग्रंथ, श्री गुरुचरित्र.*
> ***शिष्य परंपरा :***
> *१) माधव सरस्वती २) बाळसारस्वती ३) कृष्णसरस्वती ४) उपेंद्र माधव सरस्वती ५) सदानंद सरस्वती ६) ज्ञानज्योती सरस्वती ७) सिद्ध सरस्वती । विश्वव्यापक तूंचि होसी । ब्रम्हा विष्णू व्योमकेशी ।। धरिला वेष तू मानुषी । भक्तजन तारावया ।।१०।।*

सर्वसामान्य मुलाप्रमाणे रडले नाहीत. त्यामुळे सर्वांना आश्चर्य वाटले. तत्कालीन महान ज्योतिषांनी हा मुलगा साक्षात ईश्वरावतार असल्याचे सांगितले. हा लौकिक मुलगा श्रीहरीप्रमाणे सर्व नरांचे पाप, ताप, दैन्य हरण करणारा होईल म्हणून याचे नाव ' नरहरी ' असे ठेवावे, असे त्यांनी सुचविले.
याच्या स्पर्शाने आईच्या स्तनांतून अमाप दूध स्रवत असे. कौतुकात बाळ वाढू लागले. पण वय वाढत चालले तरी ॐ काराखेरीज कोणताच शब्द त्याला बोलता येत नसे. हा मुलगा मुका निघणार की काय ? अशी शंका आली. सात वर्षांपर्यंत बाळाने दुसरा शब्दच कधी उच्चारला नाही. त्याच्या मुंजीचा बेत ठरला. पण हा कुमार मंत्रोच्चार कसा करणार, म्हणून सर्वांना काळजी होती. बाळाने नाना चमत्कार करून दाखविले. लोखंडाला हात लावताच त्याने बावन्नकशी सोने करून दाखविले. मुलाचे सामर्थ्य प्रत्ययास येऊन **" तूं तारक शिरोमणी । कारणिक पुरुष कुळदीपक ॥ तुझेनि सर्वस्व लाधलें । बोलतां आम्हीं नाहीं ऐकिलें । अज्ञानमायेनें वेष्टिलें । मुकें ऐसें म्हणों तुज ॥ '** अशी कबुली मातेने दिली.
यथाविधी नरहरीचा व्रतबंध करण्यात आला. गायत्री मंत्राची दीक्षा घेऊन कुमार मातेजवळ भिक्षेसाठी आला. या वेळी बाळाने ऋग्वेदातील मंत्राचा स्पष्ट उच्चार केला, 'अग्निमीळे पुरोहितं' या मंत्राचा उच्चार ऐकताच सर्वांना नवल वाटले. यजुर्वेद, सामवेद म्हणून बाळाने सगळ्या लोकांना चकित केले. हा कुमार अवतारी पुरुष असल्याची खात्री सर्वांना पटली. मातेला बाळाने एक भिक्षा मागितली, **' निर्धार राहिला माझिया चित्ता । निरोप द्यावा आम्हां त्वरिता । जाऊं तीर्थे आचरावया ॥ '** वेदाभ्यास करण्यासाठी सर्वत्र संचार करण्याचा बाळाचा मानस पाहून मातापित्यांस दु:ख झाले. पुत्र रक्षक होईल, या आशेवर जगलेल्या मातेची निराशा झाली. आईचे दु:ख ओळखून मुलाने तिला ब्रह्मज्ञान सांगितले. तिला आणखी चार पुत्र होतील असे आश्वासन दिले आणि पूर्वजन्माची स्मृती करून दिली. त्याबरोबर **"श्रीपादश्रीवल्लभ स्वरूपता । दिसतसे तो बाळक ॥'** या श्रीपादरूपी नरहरीला ओळखून मातेने बालकाचे चरण धरले.
मुंजीनंतर ते लवकरच तीर्थयात्रेला निघाले. पण वत्सल मातेच्या आग्रहास्तव ते एक वर्ष करंज ग्रामातच राहिले. मातेला आणखी दोन सुपुत्रांची प्राप्ती झाल्यानंतर ते श्रीक्षेत्र काशीला निघाले. प्रयाणकाली त्यांनी मातेला त्रैमूर्ती दत्त-स्वरूपात दर्शन देऊन पूर्वावतारातील श्रीपाद श्रीवल्लभ आपणच असल्याचे दाखवून दिले. स्मरण करशील त्यावेळी मी तुला दर्शन देईन, असे आश्वासन देऊन ते श्रीक्षेत्र काशीला निघाले.




(वरील माहिती विविध धर्म ग्रंथातून संकलीत केली आहे.)